क्रमांक : ज्येसू-१५१७/लले-ता १७/६४/प्रशा-२/ ४९५
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन,
प्रशासकिय इमारत, आठवा मजला,
मुंबई उपनगर जिल्हा, वांद्रे (पूर्व), मुंबई — ४०० ०५१.

दिनांक : ३१/०३/२०१८

परिपत्रक

विषय :- लघुलेखक (उच्चश्रेणी/निम्नश्रेणी) संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक १/१/२०१७ रोजीची तात्पुरती ज्येष्ठता सूची प्रसारीत करणे.

संचालनालयाच्या लघुलेखक (उच्चश्रेणी/निम्नश्रेणी) संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक १/१/२०१७ रोजीची तात्पुरती ज्येष्ठता सूची संचालनालयाच्या http://mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसारीत केली आहे.

२/- या परिपत्रकान्वये सर्व संबधित कर्मचा-यांना कळविण्यांत येते की, उपरोक्त संकेतस्थळावर प्रसारीत केलेल्या तात्पुरत्या ज्येष्ठता सूचींबाबत त्यांचे काही वास्तविक आक्षेप अथवा त्रुटी (नांव, जन्मदिनांक, प्रवर्ग, रुजू दिनांक, ज्येष्ठता इत्यादी) असल्यास ते आक्षेप/त्रुटी हे परिपत्रक निर्गमित झालेल्या दिनांकापासून तीन आठवड्याच्या आत संचालनालयाकडे त्यांच्या कार्यालयप्रमुखामार्फत पाठवावेत व एक आगाऊ प्रत संचालनालयास परस्पर पाठविण्यात यावी. आक्षेप कळविताना आपला ज्येष्ठताक्रम आक्षेपात नमूद करावा. जन्मदिनांक तद्वतच जातीच्या प्रवर्गासंबंधी आक्षेप असल्यास सेवापुस्तकाच्या पहिल्या पृष्ठाची, शाळा सोडल्याच्या दाखल्याची व जातीचे प्रमाणपत्र/जातीचे वैधता प्रमाणपत्र यांची साक्षांकित प्रत अर्जासोबत संचालनालयास पाठविण्यात यावीत. मुदतीनंतर पाठविण्यात आलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

३/- ज्या कर्मचा-यांची जाती दावा पडताळणीची प्रकरणे प्रलंबित आहेत/जाती दाव्याची पडताळणी झालेली नाही अशा कर्मचा-यांच्या जाती दावा पडताळणीचा निर्णय प्राप्त होईपर्यंत त्यांची ज्येष्ठता अस्थायी स्वरुपातील असून त्यांच्या ज्येष्ठता सूचीतील जातीच्या नोंदी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून जात वैधता प्राप्त होईल या अटीस राहून नोंदल्या आहेत.

४/- प्रस्तुत परिपत्रक मिळाल्याची पोच उलट टपाली संचालनालयास संबंधित कार्यालयामार्फत पाठविण्यात यावी.

(संजय काळे)
उप संचालक (प्रशासन)
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

प्रति,
श्री. -------------------------------------
लघुलेखक (उच्चश्रेणी/निम्नश्रेणी)
--------------------------------------------------
--------------------------------------------------

प्रत :- १. सह संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय (सर्व) यांना माहितीसाठी. सदरचे परिपत्रक लघुलेखक (उच्चश्रेणी/निम्नश्रेणी) संवर्गातील कर्मचा-यांना देण्यांत यावे व त्याबाबतची पोच त्यांच्याकडून घेऊन संचालनालयास पाठविण्यांत यावी.

२. कक्ष अधिकारी (का-१४२६), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

## अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या लघुलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांची दि.१.१.२०१७ रोजीची तात्पुरती ज्येष्ठता सूची

### लघुलेखक (उच्चश्रेणी)

| अ.क्र. | ज्ये.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | प्रवर्ग | जन्म दिनांक | संवर्गातील सेवेच्या नियुक्तीचा दिनांक | नियुक्तीचा मार्ग | संवर्गातील ज्येष्ठता दिनांक / ज्येष्ठतेचा मानीव दिनांक | सेवा निवृत्तीचा दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| **खंड दिनांक १.१.२०१६ ते ३१.१२.२०१६** | | | | | | | | | |
| १ | ९ | श्री.सं.रा.मनमाडकर | | १२/०६/१९६० | ०९/१२/२०१६ | प | ०९/१२/२०१६ | ३०/०६/२०१८ | |

## अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या लघुलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांची दि.१.१.२०१७ रोजीची तात्पुरती ज्येष्ठता सूची

### लघुलेखक (निम्नश्रेणी)

| अ.क्र. | ज्ये.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | प्रवर्ग | जन्म दिनांक | संवर्गातील सेवेच्या नियुक्तीचा दिनांक | नियुक्तीचा मार्ग | संवर्गातील ज्येष्ठता दिनांक / ज्येष्ठतेचा मानीव दिनांक | सेवा निवृत्तीचा दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| **खंड दिनांक १.१.२०१६ ते ३१.१२.२०१६** | | | | | | | | | |
| निरंक | | | | | | | | | |

- ना - नामनिर्देशन
- प - पदोन्नती